Nagpur Municipal Corporation
जनतेच्या सेवेसाठी सदैव तत्पर
E-NewsLetter
एप्रिल 2017

# प्रगतीपथावर असलेली कामे जलदगतीने पूर्ण करा : महापौर



## मनपाच्या प्रकल्प आढावा बैठकीत प्रशासनाला दिले निर्देश

नागपूर महानगरपालिकेंतर्गत शहरात सुरू असलेल्या सर्व प्रकल्पांची उर्वरित कामे जलदगतीने करा, असे निर्देश देत, त्यात कुठलीही दिरंगाई चालणार नाही, असा इशारा महापौर नंदा जिचकार यांनी प्रशासनाला दिला.

मनपाच्या विविध प्रकल्प आढावा बैठकीत त्या बोलत होत्या. यावेळी माजी महापौर प्रवीण दटके, अप्पर आयुक्त आर. झेड. सिद्दीकी, मुख्य अभियंता उल्हास देबडवार उपस्थित होते. नागपूर महानगर पालिकेच्या अर्थसंकल्प 2012-13 मध्ये मनपा सभागृहाने ज्या प्रकल्पांना मान्यता दिली होती, ते सर्व प्रकल्प प्रशासनाने जलदगतीने पूर्णत्वास नेण्याच्या दृष्टीने कार्य करण्याच्या सूचना महापौर नंदाताई जिचकार यांनी दिल्या. हे प्रकल्प सुरू झाल्यास मनपाला मोठया प्रमाणात महसूल प्राप्त होऊ शकतो, असेही त्या यावेळी बोलताना म्हणाल्या.

सध्या प्रगतीपथावर असलेल्या सर्व प्रकल्पांबाबत माजी महापौर प्रवीण दटके यांनी अधिकाऱ्यांकडून माहिती घेतली. मनपाद्वारे चालणाऱ्या प्रकल्पामध्ये क्वेटा कॉलनी येथील देवाडिया दवाखाना विकासाअंतर्गत अत्याधुनिक हॉस्पीटलचे निर्माण, रेशीमबाग येथील सुरेश भट सभागृहाचे निर्माण, केळीबाग रोड महाल येथील बुधवार बाजाराचा बी.ओ. टी. तत्त्वावर विकास करणे, बुधवार बाजार सक्करदरा येथे बाजारासह शॉपिंग मॉल व सामाजिक सभागृह निर्मिती, सोक्ता भवन गांधीबाग येथे वाणिज्यिक संकुलाचे बांधकाम, वाठोडा येथे क्रीडा संकुलाची निर्मिती, वाठोडा येथे सुरु असलेले कमर्शियल कॉम्प्लेक्सचे बांधकाम, अंबाझरी उद्यान, मनपाच्या प्रशासकीय इमारती इत्यादी बांधकामाचा आढावा महापौरांनी घेतला.

कस्तुरचंद पार्क येथे मनपा व लोकमत यांच्या संयुक्त विद्यमाने उभारण्यात येण्याऱ्या देशातील सर्वात उंच तिरंगा उभारण्यास प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. या प्रकल्पाचा अंदाजे खर्च 2.50 कोटी असून या प्रकल्पाच्या निविदा तयार करण्यात आलेल्या आहेत. वाठोडा येथे उभारण्यात येणाऱ्या कौशल्य विकास विद्यापीठ व व्यवस्थापन केंद्राचे प्रथम टप्प्याचे काम 2019 पर्यंत पूर्ण होईल, अशी माहिती प्रशासकीय अधिकाऱ्यांनी दिली. सोमलवाडा, खामला, जयताळा येथे होणाऱ्या ऑरेंज सिटी स्ट्रीट प्रकल्पाची किंमत 3500 कोटी रुपये इतकी आहे. हा प्रकल्प मनपातर्फे विकसित करण्याचे प्रस्तावित आहे. ज्यामुळे मनपास भरीव उत्पन्न प्राप्त होऊ शकेल, अशीही माहिती अधिकाऱ्यांनी महापौरांना दिली. अंबाझरी येथील स्वामी विवेकानंद स्मारक लवकरच रामकृष्ण मिशन यांच्याकडे हस्तांतरीत करणार असल्याची माहितीही कार्यकारी अभियंता (प्रकल्प) नरेश बोरकर यांनी दिली. सुरेश भट सभागृहाच्या

प्रगतीबाबत सुद्धा आढावा घेण्यात आला. सदर प्रकल्प येत्या दोन महिन्यात पूर्ण करण्याच्या सूचना दिल्यात.

घनकचरा व्यवस्थापन, जलमल शुद्धीकरण करण्याची कामे, जिंजर मॉल, दानागंज बी.ओ.टी. प्रकल्पाच्या प्रगतीचा आढावा या बैठकीत घेण्यात आला. शहरातील 1,26,000 पथदिवे हे एल. ई. डी. पथदिव्यांनी बदलविण्याचे काम मार्च 2018 पर्यंत पूर्ण होईल. यामुळे 65 ते 70 टक्के ऊर्जाबचत होणार असून महापालिकेची 75 कोटींची बचत होणार आहे, अशी माहिती कार्यकारी अभियंता (विद्युत) संजय जयस्वाल यांनी दिली. महापालिकेच्या सर्व कार्यालयीन इमारतीमधील सर्व दिवे तसेच सिलींग फॅन्स हे अनुक्रमे एल. ई. डी. व एफिशियंट फॅन्स ने बदलविण्याचे कामसुद्धा मार्च 2018 पर्यंत पूर्ण होणार असल्याची माहिती त्यांनी दिली. याद्वारे महापालिकेची 92 लक्ष रूपयांची ऊर्जा बचत होणार आहे. या प्रकल्पाची एकूण अंदाजे किंमत 250 कोटी असून त्यातील 50 टक्के रक्कम राज्य शासनाच्या मेडा, पुणे या संस्थेमार्फत प्राप्त झाली आहे. उर्वरीत 50 टक्के खर्च महापालिका वहन करणार आहे. नागपूर महानगरपालिकेच्या सर्व इमारतीमध्ये, पथदिव्यांवर, पाणीपुरवठा केंद्रावर, सिवेज ट्रीटमेंट प्लांटस्वर होणाऱ्या ऊर्जेचा वापर पारंपरिक उर्जेवरून अपारंपरिक उर्जेवर होण्याचे दृष्टीने एकूण 27 मेगावॅट क्षमतेचे सौर संयंत्र या विविध ठिकाणांवर बसविण्याकरिता सल्लागाराची नेमणूक करण्यात आली असल्याची माहिती यावेळी त्यांनी दिली.

प्रगतीपथावर असलेल्या या सर्व प्रकल्पांना केंद्रीय मंत्री नितीन गडकरी लवकरच भेट देतील आणि बांधकामाचा आढावा घेतील, अशी माहिती महापौर श्रीमती जिचकार यांनी यावेळी दिली. नागपुरातील प्रकल्पांसंदर्भात मुंबई येथे मुख्यमंत्री लवकरच बैठक घेणार असून त्या बैठकीसाठी आराखडा तयार करण्याच्या सूचनाही महापौरांनी यावेळी अधिकाऱ्यांना दिल्या.

बैठकीला अधीक्षक अभियंता मनोज तालेवार, अधीक्षक अभियंता दिलीप जामगडे, कार्यकारी अभियंता (प्रकल्प) नरेश बोरकर, कार्यकारी अभियंता (पेंच प्रकल्प) अनिरुद्ध चौगंजकर, कार्यकारी अभियंता (विद्युत) संजय जयस्वाल, स्थावर अधिकारी आर.एस. भुते, उद्यान अधीक्षक सुधीर माटे आदी यावेळी उपस्थित होते.

---

# नागपुरात आजपासून स्मार्ट सिटी शिखर संमेलन



### 100 शहरांतील महापौर, आयुक्त आणि देश-विदेशातील पाहुण्यांचा सहभाग

नागपूर महानगरपालिकेच्या वतीने ‘स्मार्ट आणि सस्टेनेबल सिटी’ प्रकल्पाचा उद्देश लोकांपर्यंत पोहचविण्यासाठी तसेच राष्ट्रीय परिषद आणि प्रदर्शनीच्या माध्यमातून त्याचा प्रसार करण्यासाठी नोएडा येथील ‘इलेटस’ टेक्नोमीडिया प्रा.लि. (Elets Technomedia Pvt. Ltd. Noida) यांच्या सहकार्याने 7 आणि 8 एप्रिल रोजी हॉटेल लि-मेरिडियन येथे होत असलेल्या ‘इलेट स्मार्ट सिटी शिखर संमेलना’ची तयारी पूर्ण झाली आहे. स्मार्ट सिटी प्रकल्पात निवड झालेल्या देशातील 100 शहरांतील महापौर, आयुक्त, केंद्र शासनाचे प्रतिनिधी, विदेशातील प्रतिनिधी आदींचा सहभाग या संमेलनात राहणार आहे. यापैकी बहुतांश प्रतिनिधींचे आगमन नागपुरात झालेले आहे.

शिखर संमेलनाचे उद्‌घाटन सकाळी 9 वाजता होईल. यावेळी गृह (नागरी) आणि नागरी विकास राज्यमंत्री डॉ. रणजित पाटील, महापौर नंदा जिचकार यांची प्रमुख उपस्थिती राहील. उपमहापौर दीपराज पार्डीकर, स्थायी समितीचे अध्यक्ष संदीप जाधव , सत्तापक्ष नेते संदीप जोशी, विरोधी पक्ष नेते संजय महाकाळकर यावेळी प्रामुख्याने उपस्थित राहतील. संमेलनाचा समारोप 8 एप्रिल रोजी दुपारी 1 वाजता होईल. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची प्रमुख उपस्थिती राहील.

या दोन दिवसीय शिखर संमेलनात नागपूर शहरात स्मार्ट सिटी प्रकल्पांतर्गत राबविण्यात येत असलेल्या उपक्रमांचा आराखडा मांडण्यात येईल. स्मार्ट सिटी प्रकल्पांतर्गत विविध शहरात सुरू असलेल्या उपक्रमांच्या माहितीचे देवाण-घेवाण या परिषदेच्या माध्यमातून होणार आहे. ‘स्मार्ट आयडिया’ मांडण्याच्या आणि त्या अंमलात आणण्यासाठी गुंतवणुकीच्या दृष्टीने नागपूर कसे चांगले शहर आहे, यादृष्टीने शिखर संमेलनात मांडणी करण्यात येणार आहे.

यासंदर्भात बोलताना महापौर नंदाताई जिचकार म्हणाल्या, नागपुरात होत असलेले स्मार्ट ॲण्ड सस्टेनेबल सिटी शिखर संमेलन हे स्मार्ट सिटी उपक्रमात मैलाचा दगड ठरणार आहे. या परिषदेचा फायदा देशभरातील स्मार्ट सिटी प्रकल्पासाठी निवड झालेल्या शहरांना होणार आहे. नागपूर शहर स्मार्ट शहर बनविण्यात हे संमेलन महत्त्वाची भूमिका निभावणार आहे. नागपूर हे एकात्मिक स्मार्ट सिटी प्रकल्प राबविणारे पहिले शहर ठरले असून इतर शहरांसाठी ते मॉडेल आहे. नागपुरातील पाणी पुरवठा यंत्रणा उत्तम असून 24 बाय 7 कडे वाटचाल करीत असल्याचेही त्यांनी सांगितले.

ही शिखर परिषद स्मार्ट शासन, स्मार्ट वाहतूक, स्मार्ट पायाभूत सुविधा आणि स्मार्ट पर्यावरण या थीमवर आधारीत

आहे. सदर निरनिराळ्या विषयावर मार्गदर्शन करण्यासाठी खासगी आणि सरकार क्षेत्रातील देशभरातील विचारवंत, धोरण तयार करणारे, उद्योगतज्ज्ञ आणि स्मार्ट सिटी प्रकल्पाशी संबंधित अन्य भागधारक सहभागी होणार आहेत. देशभारतील स्मार्ट नागरी पायाभूत सुविधा विकासाच्या दृष्टीने अनुभव आणि कल्पनांची देवाण-घेवाण करण्यासाठी या शिखर संमेलनाच्या निमित्ताने चांगले व्यासपीठ उपलब्ध होणार आहे.

विविध सत्रांच्या माध्यमातून ही विचारांची देवाण-घेवाण होणार आहे. 'डिजीटल युगातील भारतातील स्मार्ट शहरे', 'स्मार्ट शहर निर्मितीत आयओटी आणि आयसीटीची भूमिका', 'स्वच्छ भारत-प्रत्यक्षात आकार घेत असलेले एक मिशन', 'आंतरराष्ट्रीय स्मार्ट सिटीचा अनुभव', 'स्वस्त घरे' याशिवाय अन्य विषयांवर चर्चा होईल. याव्यतिरिक्त स्मार्ट शहर विकसित करण्यासंदर्भातील मुद्द्यांवर विचारमंथन होईल.

राज्यातील विविध संस्था आणि खासगी कंपन्याचे स्टॉल्सही शिखर संमेलनादरम्यान आयोजित प्रदर्शनीत राहतील. संमेलनाचा समारोप 8 एप्रिल रोजी दुपारी 1 वाजता होईल.

**'स्मार्ट सिटी'वर आधारीत आंतरराष्ट्रीय चित्रपटाचा प्रीमियर**

ऑस्कर अवॉर्ड विजेते आंतरराष्ट्रीय ख्यातीप्राप्त दिग्दर्शक वुडी ऍलन यांनी खास जगभरातील स्मार्ट सिटी साठी तयार केलेल्या 'बार्सिलोना-द रोज ऑफ फायर' या चित्रपटाचा तिसरा आंतरराष्ट्रीय प्रीमियर या शिखर संमेलनाच्या निमित्ताने नागपुरातील पीव्हीआर या मल्टीप्लेक्समध्ये 7 एप्रिल रोजी सायंकाळी 6 वाजता दाखविण्यात येईल. हा प्रीमियर संमेलनाचे खास आकर्षण असून यापूर्वी बार्सिलोना आणि पॅरीस या दोन शहरात या चित्रपटाचा प्रीमियर शो आयोजित करण्यात आला होता. या चित्रपटाच्या निमित्ताने 'स्मार्ट सिटी'बाबत चांगला अनुभव सहभागार्थ्यांना आणि नागरिकांना मिळणार आहे.

नागपुरातील प्रकल्पांना भेट देण्याची सोय

'स्मार्ट सिटी' प्रकल्पांतर्गत नागपूर महानगरपालिकेने मागील दीड वर्षांत अनेक नावीन्यपूर्ण प्रकल्प साकारले आहे. या प्रकल्पांना भेट देण्याची सोय सुद्धा संमेलनाच्या निमित्ताने करण्यात आली असल्याची माहितीही महापौर नंदाताई जिचकार आणि आयुक्त श्रावण हर्डीकर यांनी पत्रपरिषदेत दिली.

# नागपूर देशातील 'स्मार्ट सिटी' साठी मॉडेल ठरणार – महापौर




## 'स्मार्ट ऍन्ड सस्टेनेबल सिटी' शिखर परिषदेचे थाटात उद्‌घाटन

स्मार्ट सिटीच्या तिस-या टप्प्यात निवड झाल्यानंतर अवघ्या काही महिन्यातच नागपूर शहरात अनेक महत्त्वकांक्षी उपक्रम राबविण्यात आलेत. स्मार्ट स्ट्रीट, एसटीपी हे पथदर्शी प्रकल्प इतर शहरांसाठी जसे मार्गदर्शक ठरत आहेत. तसेच भविष्यात नागपूर शहर हे देशातील अन्य स्मार्ट सिटी प्रकल्पात निवड झालेल्या शहरासांठी 'स्मार्ट मॉडेल ' ठरेल असा आशावाद महापौर नंदा जिचकार यांनी व्यक्त केला.

नागपूर महानगरपालिकेच्या वतीने इलिट्स टेक्नो मिडिया प्रा.लि च्या सहकार्याने हाटेल लि मेरिडियन येथे आयोजित दोन दिवसीय स्मार्ट ऍन्ड सस्टेनेबल सिटी शिखर परिषदेच्या उद्‌घाटन प्रसंगी त्या बोलत होत्या. मंचावर राज्याच्या माहिती व तंत्रज्ञान विभागाचे प्रधान सचिव व्ही.के. गौतम, सत्तापक्ष नेते संदीप जोशी, मनपा आयुक्त श्रावण हर्डीकर, बार्सिलोनाचे माजी उपमहापौर ऍन्थोनी विवस थामस, विश्वराज इन्फ्रास्ट्रक्चरचे अध्यक्ष अरुण लाखानी, सिस्कोचे व्यवस्थापकीय संचालक अनिल नायर, फिलीप्स लायटिंगचे मुख्यकार्यकारी अधिकारी हर्ष चितळे, बँक आफ महाराष्ट्रचे वरिष्ठ महाव्यवस्थापक एन.व्ही पुजारी, एनसीसीचे संचालक रघु अल्लोरी, इलिट्सचे मुख्य कार्यकारी अधिकारी डा रवि गुप्ता उपस्थित होते.

महापौर नंदा जिचकार पुढे म्हणाल्या, □स्मार्ट सिटी प्रकल्पात निवड झाल्यानंतर स्मार्ट वाहतूक, स्मार्ट पर्यावरण, स्मार्ट पायाभूत सुविधा आणि स्मार्ट प्रशासनाच्या दिशेने कार्य सुरु झाले आहे. इतर शहरांच्या तुलनेत नागपूरने वेगाने कार्य सुरु केले आहे. नागपुरात होऊ घातलेले स्मार्ट ऍन्ड स्टेनेबल सिटी शिखर संमेलन हे स्मार्ट सिटी उपक्रमात मैलाचा दगड ठरणार आहे. या संमेलनाचा लाभ देशभरातील स्मार्ट सिटी प्रकल्पासाठी निवड झालेल्या शहरांना होणार असून नागपूर शहर □स्मार्ट□ करण्याच्या दृष्टीने या संमेलनाची भूमिका महत्त्वाची ठरणार आहे, असेही त्या पुढे म्हणाल्या. संमेलनाचे उद्‌घाटन झाल्याचे जाहीर करुन त्यांनी संमेलनात देशविदेशातून सहभागी झालेल्या प्रतिनिधींचे महापौर या नात्याने शाब्दिक स्वागत केले.

या प्रसंगी बोलताना बार्सिलोनाचे माजी उपमहापौर ऍन्थोनी विवस थामस म्हणाले, वायफाय, सिसीटीव्ही कॅमेरा, सेन्सार लाईट्स, रस्ते म्हणजेच स्मार्ट सिटी नसून शहरातील प्रत्येक घटकाचा विकास व्हावा, तसेच विविध नागरी सुविधांचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविणे म्हणजेच स्मार्टसिटी साकारणे होईल, हे सोदाहरण स्पष्ट केले.

विश्वराज इन्फ्रास्ट्रक्चरचे अध्यक्ष अरुण लखानी म्हणाले, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

यांच्या दूरदृष्टीतून अनेक महत्त्वाचे प्रकल्प नागपुरात आकारास येत आहे. पीपीपी मध्ये आता चौथा 'पी' जोडायचा आहे आणि तो म्हणजे पब्लिकचा 'पी' आणि या 'चार पी' माडेलचे आपण भागीदार असल्याचा आपल्याला अभिमान आहे.

सिस्कोचे व्यवस्थापकिय संचालक अनिल नायर, फिलीप्स लाईटिंगचे सीईओ हर्ष चितळे, बँक आफ महाराष्ट्राचे वरिष्ठ महाव्यवस्थापक एन.व्ही. पुजारी, एनसीसीचे संचालक रघु अल्लोरी यांनीही यावेळी मार्गदर्शन केले.

राज्याचे माहिती व तंत्रज्ञान विभागाचे प्रधान सचिव व्ही.के.गौतम यांनी स्मार्ट सिटीमधील डिजीटलएझेशनवर प्रकाश टाकला, तंत्रज्ञानाचा वापर स्मार्ट सिटी प्रकल्पात कशाप्रकारे केला जातोय आणि नागपूरात ते कशाप्रकारे अमलात आणले जातेय, याबाबत माहिती दिली.

प्रस्ताविक भाषणातून मनपा आयुक्त श्रावण हर्डीकर यांनी ही संधी असल्याचे सांगितले. स्मार्ट ऍन्ड सस्टेनेबल सिटी शिखर परिषद म्हणजे विचारांचे आदानप्रदान आणि कल्पनांची देवाण-घेवाण करण्याच्या दृष्टीने उत्तम व्यासपीठ असल्याचे सांगितले. यात सहभाग घ्या, अनुभवांचे आदानप्रदान करा आणि आपले शहर स्मार्ट बनविण्यात महत्त्वाची भूमिका निभवा, असे सांगितले.

तत्पूर्वी महापौर नंदाताई जिचकार आणि अन्य मान्यवरांच्या हस्ते दीप्रज्वलन करुन संमेलनाचे उद्घाटन करण्यात आले. इलीट्स ने प्रकाशित केलेल्या नागपूर वर आधारीत इ-गव्हर्नस पुस्तकाचे विमोचन यावेळी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. मनपा आयुक्तांच्या हस्ते सर्व प्रमुख पाहुण्यांना स्मृतीचिन्ह प्रदान करण्यात आले. इलीट्सचे सीईओ डा. रवी गुप्ता यांनी मनपा आयुक्त श्रावण हर्डीकर यांना स्मृचीचिन्ह देऊन त्यांचा सन्मान केला. आभार डा. रवी नायर यांनी मानले.

### प्रदर्शनीचे उद्घाटन

शिखर संमेलनाच्या औपाचरिक उद्घाटनानंतर महापौर नंदाताई जिचकार यांनी फीत कापून प्रदर्शनीच उद्घाटन केले. नागपूर स्मार्ट सिटी प्रकल्पात भागीदार असलेल्या विविध संस्था, बँका आणि कंपन्यांचे स्टाल या प्रदर्शनीत आहेत. मनपाच्यावतीने आपले सरकार, ग्रीन बस, नागनदी विकास, आरेंज सिटी स्ट्रीट चे स्टाल असून नागपूर मेट्रोची माहिती देणारेही स्टाल आहेत.

### विविध विषयांवर चर्चासत्र

शिखर संमेलनात चार सभागृहात चार विविध विषयांवर चर्चासत्र आयोजित करण्यात आली. इंटरनॅशनल एक्सपिरियंस आन स्मार्ट सिटीज, स्मार्ट आणि सस्टेनेबल मोबिलिटी, स्वच्छ इंडिया फार ए स्मार्टर इंडिया, इफेक्टिव्ह वेस्ट मॅनेजमेंट फार स्मार्ट सिटीज, आयटी ऍन्ड इ गर्व्हरनंस फार स्मार्ट सिटी इको सिस्टीम, स्मार्ट इन्फ्रास्ट्रक्चर ऍन्ड स्मार्ट हाऊसिंग फार स्मार्ट सिटीज, वाटर मॅनेजमेंट फार स्मार्टर अर्बन लोकल बाडीज हे शिखर संमेलनातील चर्चासत्राचे विषय होते. प्रत्येक विषयावर तज्ज्ञांनी त्यांचे विचार मांडले.

---

# योजनांची माहिती शेतकऱ्यांपर्यंत पोहोचणे गरजेचे - महापौर



## डॉ. पंजाबराव देशमुख यांना आदरांजली

पूर्वी शेती हा प्रतिष्ठेचा व्यवसाय होता. परंतु आता शेती करताना येणाऱ्या अडचणी पाहता शेती करणे कष्टप्रद होत आहे. शासनाने शेतकऱ्यांसाठी विविध योजना आखल्या आहेत. परंतु त्यांची माहिती शेतकऱ्यांपर्यंत पोहचत नसल्याने या योजनांचा लाभ शेतकऱ्यांना व्हावा यासाठी शेतकऱ्यांकरिता असलेल्या विविध योजनांची माहिती त्यांच्यापर्यंत पोहोचणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन महापौर नंदा जिचकार यांनी केले.

थोर कृषीतज्ज्ञ, शिक्षण महर्षी आणि भारताचे पहिले कृषिमंत्री डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या 52 व्या पुण्यतिथीनिमित्त सकाळी महाराजबाग चौक जवळील कृषी विद्यापीठ स्थित डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या प्रतिमेला महापौर श्रीमती नंदा जिचकार व उपमहापौर दीपराज पार्डीकर यांनी पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहिली. याप्रसंगी मार्गदर्शन करताना त्या बोलत होत्या. यावेळी आमदार परिणय फुके, प्राचार्य बबनराव तायवाडे, कृषी विद्यापीठाचे डॉ. संजय धोटे, रमेश बोरकुटे, प्रा. टेकाडे, डॉ. कलंत्री, ॲग्रोवेटचे दिलीप मोहीतकर, प्रणय पराते, उद्यान अधीक्षक सुधीर माटे आदी प्रामुख्याने उपस्थित होते.

# दिक्षाभूमी ते ड्रॅगन पॅलेस बससेवा नागरिकांची मागणी रास्तच- महापौर



### महापौर नंदा जिचकार यांच्या हस्ते बसचे लोकार्पण

दिक्षाभूमी ते ड्रेगन पॅलेस बससेवा सुरु करण्याची भाजपच्या अनुसूचित मोर्च्याची व अनेक संघटनांनी मागणी केली होती, नागरिकांची ही मागणी रास्तच होती त्यामुळे तातडीने यावर निर्णय घेऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 126 व्या जयंतीचे औचित्य साधून नागरिकांच्या सुविधेसाठी या बससेवेचे लोकार्पण केले असे विधान महापौर नंदा जिचकार यांनी केले. बुधवार ता. 12 रोजी सकाळी 11 वाजता दीक्षाभूमीच्या मुख्य प्रवेशद्वारा समोर महापौरांच्या हस्ते दीक्षाभूमी ते ड्रॅगन पॅलेस बससेवेचे लोकार्पण पार पडले.

याप्रसंगी उपमहापौर दिपराज पार्डीकर, स्थायी समितीचे अध्यक्ष संदीप जाधव, आमदार डॉ. मिलिंद माने, स्थापत्य समितीचे सभापती संजय बंगाले, धरमपेठ झोनच्या सभापती रुपा रॉय, नगरसेवक सुनील हिरणवार, ॲड. धममपाल मेश्राम, लखन येरावार, प्रमोद तभाणी, परिवहन व्यवस्थापक शिवाजी जगताप, सहायक आयुक्त महेश मोरोणे, परिवहन प्रशासकीय अधिकारी अरुण पिपूरडे, दीक्षाभूमी स्मारक समितीचे व्यवस्थापक व विश्वस्त डॉ. सुधीर फुलझले, डॉ. आंबेडकर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी.सी.पवार, आशिष फुलझले, जितू बनसोड, विक्रांत गजभिये, शामराव हाडके, राहूल कांबळे, संजय पाटील, सतीश शिरसवान व इतर मान्यवर उपस्थित होते. या प्रसंगी बोलताना महापौर म्हणाल्या, दहा पंधरा दिवसांपूर्वीच मला अनेक संघटनेकडून निवेदन मिळाले, दीक्षाभूमीला भेट देणारे पर्यटक, उपासक, महाविद्यालयीन विद्यार्थी आदींसाठी ही मागणी अतिशय रास्त होती परिणामी या मार्गावर चालणाऱ्या दोन बस सेवेचे लोकार्पण करताना मला अतिशय आंदन होत आहे. आमचे शासन नेहमीच लोकांच्या सेवेसाठी तत्पर आहे. माननीय केंद्रिय मंत्री नितीन गडकरी व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे ब्रिदच आहे, सत्ता ही लोकांच्या सेवेसाठीच राबवायची, त्यांच्याच मार्गदर्शनाखाली आम्हाला सर्व स्तरातील लोकांना जास्तीत जास्त कशी सेवा पुरविता येईल याचा आम्ही प्रयत्न करणार आहे. या पुढे ही जनतेच्या सुविधेसाठीच आमचे सरकार काम करणार असल्याचे महापौर यांनी सांगितले.

प्रारंभी महापौर, उपमहापौर व इतर मान्यवरांच्या हस्ते दोन्ही बसेसची फित कापून नारळ फोडण्यात आला. मेणबत्ती पेटवून फूले वाहण्यात आली. याप्रसंगी दीक्षाभूमीचे व्यवस्थापक व विश्ववस्तांनी महापौरांचे विशेष आभार मानले. सुत्र संचालन जन संपर्क अधिकारी अशोक कोल्हटर यांनी केले.

### बसेस चे वेळापत्रक

सकाळी 7.20 पासून रात्री 9.30 पर्यंत येणे-जाणे धरुन एकूण 22 फेऱ्या एका बसची असेल तर दुसरी बस सकाळी 9.45 ते रात्री 8.45 दरम्यान एकूण 6 फेऱ्या मारणार. दीक्षाभूमी ते मोरभवन तिकीटाचे दर 8 रुपये असून दीक्षाभूमी ते ड्रॅगन पॅलेस पर्यंतचा तिकीट दर 30 रुपये आहे. एका बसची आसन क्षमता 35 असून उभ्यानेही काही प्रवासी प्रवास करु शकतात. विशेष म्हणजे या दोन्ही बसच्या वाहक या महिला असून रंजना सुखदेव व सरोज पखाले वाहकांची जवाबदारी सांभाळणार आहेत.

# उन्हापासून बचावासाठी मनपाचे सर्व बगीचे खुले




## मनपाची झोननिहाय उद्याने

एप्रिल महिना चांगलाच तापला आहे. नागपूरचे तापमान आता 44 डिग्रीच्या पलिकडे पोहोचले आहे. वाढणाऱ्या तापमानाचा नागरिकांना कोणताही त्रास होऊ नये. विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक,मजूर, कामगार आदींना भर दुपारी हक्काचे विसाव्याचे ठिकाण उपलब्ध व्हावे याकरिता नागपूर महानगरपालिकेची त्याच्या अखत्यारीत असणारी सर्व 92 उद्याने 1 एप्रिल ते 31 जून पर्यंत सकाळी 10 वाजता पासून दिवसादेखिल खुली असणार आहे. एवढेच नव्हे तर शहरात नासुप्रच्या अधीन असणारी उद्यानेदेखिल नागरिकांसाठी खुली असणार आहे. नागरिकांच्या सोयीसाठी खास मनपाच्या उद्यानाची यादी आम्ही येथे देत आहोत...

मनपाची झोननिहाय उद्याने

### लक्ष्मीनगर झोन क्र. 1

बजाज नगर उद्यान/एल.आय.सी. कॉलनी सुरेंद्र नगर उद्यान/ नरगुंदकर उद्यान/ साहस कॉलनी उद्यान/ लक्ष्मीनगर बुटी लेआऊट उद्यान/ तात्या टोपे नगर उद्यान/ शास्त्री लेआऊट उद्यान/ रेणुकामाता उद्यान/ गोविंदनगर उद्यान/ नरकेसरी जयप्रकाशनगर उद्यान/ मॉर्डन सोसायटी उद्यान/ प्रशांतनगर उद्यान/ जुने स्नेहनगर उद्यान/ हेडगेवार लायब्रेरी उद्यान/पी.एम.जी.सोसायटी उद्याने, नरेंद्रनगर, वासूदेवनगर.

--------------------------

### धरमपेठ झोन क्र. 2

अंबाझरी उद्यान/ सिव्हील ऑफिस उद्यान/ ज्ञानयोगी डॉ. श्रीकांत जिचकार ट्राफिक पार्क / शंकरनगर त्रिकोणी पार्क/शिवाजीनगर उद्यान/ शंकरनगर उद्यान/ काचीपुरा उद्यान/ अभ्यंकरनगर उद्यान/ रविनगर उद्यान

--------------------------------------------

### हनुमाननगर झोन क्र. 3

महात्मा गांधी उद्यान, हनुमाननगर/ रमाबाई आंबेडकर उद्यान, चंदननगर/ रेशीमबाग उद्यान/ मट्टीपुरा सिरसपेठ उद्यान/ पूर्व बालाजीनगर उद्यान/ उल्हासनगर उद्यान/ त्रिशरण बौद्धविहार उद्यान/ राममंदिर चंदननगर उद्यान.

------------------------------------------------------

**धंतोली झोन क्र.4**

बालभवन उद्यान गांधीसागर तलाव सुभाष रोड/ भाऊजी पागे उद्यान/ भापकर पार्क कॉटन मार्केट/ मोक्षधाम दहनघाट उद्यान/ मेजर आनंद खरे उद्यान(लेन्ड्रा)/ छोटी धंतोली उद्यान/ दगडी पार्क रामदासपेठ/ मेजर सुरेंद्र देव पार्क (धंतोली)/काँग्रेसनगर उद्यान/ कर्वे नगर उद्यान वर्धा रोड/ कॉस्मोपॉलीटन सोसायटी, उज्ज्वलनगर उद्यान/ महात्मा फुले उद्यान सुयोगनगर

................................................................

**नेहरुनगर झोन क्र. 5**

त्रिशताब्दी उद्यान जुना नंदनवन/ नेहरुनगर उद्यान झोन ऑफिस जवळ/ महात्मा फुले ओम नगर उद्यान/ ओमनगर युवा पार्क उद्यान/ आझाद पार्क उद्यान/ आदर्श प्रगती कॉलनी उद्यान/ लक्ष्मीनारायण मंदिर उद्यान

...................................................................

**गांधीबाग झोन क्र. 6**

गांधीबाग उद्यान/ अमर शहीद सुनील ज्ञानेश्वर स्मृती उद्यान महाल/ नवाबपुरा उद्यान/ गंगाबाई दहन घाट उद्यान जुनी मंगळवारी रोड/ चिटणवीसपुरा उद्यान/ तुळशीबाग उद्यान

........................................................................

**सतरंजीपुरा झोन क्र. 7**

शांतीनगर हाऊसिंग बोर्ड कॉलनी उद्यान/ शांतीनगर उद्यान (जुना)/ एल.आय.जी. उद्यान/नाईक तलाव उद्यान तांडापेठ/ डॉ.बाबासाहेब आंबेडकर उद्यान, बारसेनगर/ लालबहादूर शास्त्री उद्यान, पाचपावली रेल्वे गेट/ लालगंज झाडे चौक उद्यान/नामदेवनगर उद्यान.

...........................................................

**लकडगंज झोन.क्र.8**

भारतमाता व डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान, गरोबा मैदान/ वैष्णवदेवी उद्यान, गरोबा मैदान इस्ट वर्धमाननगर रोड/ बरसटे उद्यान, लकडगंज/ राम मनोहर लोहिया उद्यान, टेलिफोन एक्सचेंज चौक/ मोचीपुरा बगडगंज उद्यान/ हिवरीनगर पावर हाऊस उद्यान/ माहेश्वरी भवन उद्यान,हिवरीनगर/

..................................................

**आशीनगर झोन.क्र 9**

कपिलनगर उद्यान, नारी रिंग रोड/ रमाईनगर उद्यान, नारी रिंग रोड/ शेंडे नगर उद्यान/ सिद्धार्थनगर उद्यान, टेकानाका/ न्यू ठवरे कॉलोनी उद्यान/ तथागत विहार वैशालीनगर उद्यान/ विदर्भ हाऊसिंग बोर्ड कॉलनी बालाभाऊपेठ उद्यान/ गुरुनानकपुरा उद्यान/ सम्राट अशोक विहार उद्यान/ लष्करी बाग उद्यान

..........................................................

**मंगळवारी झोन क्र. 10**

ग्रीन पार्क, राज नगर, काटोल रोड/ गंगा कावेरी, राज नगर उद्यान/ अ‍ॅड. सखाराम पंत मेश्राम उद्यान(मंगळवारी उद्यान)/राजभवन उद्यान/ कस्तुरबा लायब्ररी उद्यान(सदर)/ के.टी.नगर नक्षत्र नगर उद्यान/ बंधूनगर व गायत्रीनगर उद्यान/ दयालु सोसायटी उद्यान/ उत्कर्षनगर उद्यान/ सुगत कॉलनी उद्यान.

---

# नदी स्वच्छता अभियानातील लोकसहभागासाठी

## 21 एप्रिलला विविध क्षेत्रातील प्रतिनिधींची बैठक

शहर सौंदर्यीकरण आणि पर्यावरण संरक्षणाच्या दृष्टीकोनातून नागपूर महानगरपालिकेने सुरू केलेल्या नदी स्वच्छता अभियानात लोकसहभाग मिळविण्यासाठी विविध क्षेत्रातील प्रतिनिधींची बैठक शुक्रवार 21 एप्रिल रोजी दुपारी 3 वाजता नागपूर महानगरपालिकेच्या राजे रघोजीराव भोसले नगर भवनात आयेजित करण्यात आली आहे. नागपूर महानगरपालिकेच्या वतीने 17 एप्रिलपासून नागनदी, पोहरा नदी आणि पिवळी नदी स्वच्छता अभियानाची सुरुवात पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते झाली. या अभियानात मोठ्या प्रमाणात लोकांनी सहभाग घ्यावा आणि या लोकसहभागासाठी समाजातील विविध क्षेत्रातील घटकांचे सहकार्य मिळावे यासाठी सदर बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. स्वयंसेवी संस्था आणि पर्यावरणवादी संस्थांच्या साहाय्याने लोकजागृती करण्याचे आणि कार्पोरेट कंपन्यांच्या माध्यमातून यंत्रसामुग्रीची उपलब्ध करण्याचे आवाहन सदर बैठकीत करण्यात येणार आहे. यावेळी नदी स्वच्छता संदर्भातील सादरीकरणही महानगरपालिकेच्या वतीने करण्यात येणार आहे.

सदर बैठक महापौर नंदा जिचकार यांनी आमंत्रित केली असून वर्तमानपत्रांचे संपादक, पत्रकार, स्वयंसेवी संस्था, गैरसरकारी संघटन, शासकीय कार्यालयातील प्रतिनिधी, कार्पोरेट क्षेत्रातील प्रतिनिधींनी बैठकीत सहभागी होण्याचे आवाहन महापौर नंदा जिचकार केले आहे.

# मनपा संघाचा रिझर्व्ह बँक संघावर दणदणीत विजय



### गझदर लीग आंतरसंस्था क्रिकेट स्पर्धा

विदर्भ क्रिकेट असोशिएशनतर्फे आयोजित ‘गझदर लीग’ आंतरसंस्था क्रिकेट स्पर्धेत मनपा विरुद्ध रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचा सामना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मैदान, दीक्ष् भूमी येथे पार पडला. मनपा संघाने या सामन्यात दणदणीत विजय संपादन केला.

नागपूर महानगरपालिका संघाने प्रथम फलंदाजी करुन 20 षटकात 5 गडी बाद 167 धावा केल्या. पांडुरंग शिंदे यांनी उत्कृष्ट अष्टपैलू खेळ करीत 42 धावा काढल्या. गोलंदाजी करताना विरुद्ध संघाचे 2 गडी बाद केले. अनिल तांबे यांनी आक्रमक फटकेबाजी करीत 62 धावा काढल्या. प्रत्युत्तरात रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचा डाव 16.3 षटकात 89 धावात संपुष्टात आला. कर्णधार जितेंद्र गायकवाड यांच्या नेतृत्वात हा सामना 78 धावांनी जिंकून मनपा नागपूरने सलग दुसरा विजय प्राप्त केला. संक्षिप्त धावफलक (फलंदाजी) : अनिल तांबे (62 धावा), पांडुरंग शिंदे (42 धावा), जितेंद्र गायकवाड (13 धावा), प्रांजु नायर (10 धावा).

रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (गोलंदाजी) : अथर्व गुंजल (4 ओवर 1 व्हाईड 33 धावा), अभिनव शेखर (4 ओवर 1 व्हाईड 28 धावा), निखिल धावडे (4 ओवर 1 व्हाईड 30 धावा), नीरज गावंडे (4 ओवर 1 व्हाईड 33 धावा). रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (फलंदाजी) : श्रेयस बागडे (26 धावा), कल्पेश (14 धावा), रोहित (11 धावा), प्रमोद लुले (11 धावा). महानगरपालिका नागपूर (गोलंदाजी) : पुरुषोत्तम जनवरे (3.3 ओवर 3 व्हाईड 16 धावा), पांडुरंग शिंदे (4 ओवर 2 व्हाईड 27 धावा), विरेंद्र नाहारकर (4 ओवर 2 व्हाईड 27 धावा), नितीन झाडे (3 ओवर 1 व्हाईड 25 धावा).

# शहराचा चेहरामोहरा बदलण्यासाठी आपण सर्व प्रयत्न करणार – अश्विन मुद्गल



### मनपाचे नवे आयुक्त अश्विन मुद्गल यांची ग्वाही

नागपुरात सुरू असणारे प्रकल्प प्राधान्याने पूर्ण करण्याची गरज आहे. यातही नागरी प्रकल्प अग्रक्रमाने पूर्ण करण्यावर आपला भर राहील. 'स्मार्ट सिटी' योजनेत समावेश झाल्याने आपल्या कार्यकाळात शहराचा चेहरामोहरा बदलण्यासाठी आपण सर्व प्रयत्न करणार. नागरिकांना विश्वासात घेऊन राजकीय प्रतिनिधींच्या सहकार्यातून प्रकल्प वेगाने पूर्ण होतील, अशी ग्वाही नवे आयुक्त अश्विन मुद्गल यांनी दिली.

बुधवारी सकाळी 10.30 वाजता त्यांनी नागपूर महानगरपालिकेचे आयुक्त म्हणून मावळते आयुक्त श्रावण हर्डीकर यांच्याकडून पदभार स्वीकारला.

2007 च्या तुकडीचे आयएएस अधिकारी असलेले मुद्गल हे परीविक्षाधीन कालावधीत नाशिक येथे होते. त्यानंतर सांगली येथे जिल्हा परिषदेचे सीईओ, यवतमाळचे जिल्हाधिकारी आणि गेल्या अडीच वर्षांपासून सातारा येथे जिल्हाधिकारी होते. आतापर्यंत महसूलमध्ये काम केल्याचा अनुभव पाठिशी होता. स्थानिक स्वराज्य संस्थेतील मनपात त्यांना पहिलीच नियुक्ती आहे. त्यामुळे नवे काम, नवे प्रकल्प व आव्हाने असतील हे मानूनच पहिल्या दिवसापासून कामाला लागणार असल्याचे त्यांनी सांगितले.

नागपूर शहर ऐतिहासिक व सांस्कृतिकदृष्टया अत्यंत महत्वाचे आहे. शहराची ही ओळख जपून काम करावे लागेल. या शहराला विकासाचा नवा चेहरा देण्याचा प्रयत्न राहील. मुख्यमंत्री व केंद्रीय मंत्री यांचे शहर असतानाच देशाचे केंद्रस्थान आहे. त्यामुळे काम करताना दीर्घकालीन विचार करूनच प्रकल्प पूर्ण करावे लागणार असल्याचेही यावेळी ते म्हणाले. केंद्र सरकारने शहराच्या विकासासाठी दिलेले कार्यक्रम पूर्ण जोमाने राबविण्याचाही प्रयत्न राहील. नव्या कल्पना व लोकप्रतिनिधींच्या सूचनांचा सन्मान करण्यात येईल. या शहरात काम करण्याची संधी मिळत असल्याने, शहरात मुलभूत सुविधा व नागरिकांच्या गरजा पूर्ण करण्यात मनपा कुठेही कमी पडणार नाही. कुठलेही प्रकल्प व काम करताना ते दर्जात्मक असेल याची दक्षता घेतली जाईल. आपला पुढील कार्यकाळ शहराच्या विकासासाठी व नागरिकांच्या हितासाठी असेल, अशी ग्वाहीही मुद्गल यांनी यावेळी दिली.

# मनपातर्फे 29 एप्रिल रोजी ‘ स्वरधारा ’



## डॉ. आंबेडकर व महात्मा फुले जयंती समारोह

विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर व महात्मा फुले जयंती निमित्त महानगरपालिकेतील अधिकारी व कर्मचारी यांच्यातर्फे मनपा मुख्यालयातील हिरवळीवर शनिवार दिनांक 28 एप्रिल रोजी सायं 5.30 वाजता सुप्रसिद्ध संगीतकार सूरमणी पंडित प्रभाकर धाकडे यांच्या ‘ स्वरधारा ’ या संगीतमय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

याप्रसंगी मनपाचे नवनिर्वाचित पदाधिकारी यांचा सत्कार समारंभदेखिल संपन्न होईल. अध्यक्षस्थानी महापौर नंदाताई जिचकार राहतील. उपमहापौर दीपराज पार्डीकर यांची प्रामुख्याने उपस्थिती राहील. प्रमुख पाहुणे म्हणून स्थायी समितीचे अध्यक्ष् संदीप जाधव, सत्ता पक्ष् नेते संदीप जोशी, माजी महापौर प्रवीण दटके, विरोधी पक्ष् नेते संजय महाकाळकर, बसपा नेते मोहम्मद जमाल, मनपा आयुक्त अश्विन मुदगल, नागपूर मनपाचे माजी आयुक्त व पिंपरी चिंचवडचे मनपा आयुक्त श्रावण हर्डीकर आदी मान्यवर उपस्थित राहतील.

# शहरातील रस्त्यांचे काम उच्च दर्जाचे करा- संजय बंगाले



स्थापत्य व प्रकल्प विशेष समितीची आढावा बैठक

नागपूर शहरातील नागपूर महानगर पालिकेअंतर्गत सुरू असलेले सर्व रस्त्यांची कामे उच्च दर्जाची करा, असे आदेश स्थापत्य व प्रकल्प समिती सभापती संजय बंगाले यांनी केले. स्थापत्य व प्रकल्प समितीच्या पहिल्या आढावा बैठकीत ते बोलत होते.

बैठकीला माजी सत्तापक्ष नेते दयाशंकर तिवारी, उपसभापती अभय गोटेकर, समिती सदस्य सुषमा चौधरी, विद्या कन्हेरे, पल्लवी श्यामकुळे, रश्मी धुर्वे, शेख मोहम्मद जमाल मो. ईब्राहिम, मुख्य अभियंता उल्हास देबडवार आदी उपस्थित होते. पुढे बोलताना सभापती बंगाले म्हणाले, नागपुरातील रस्त्याची कामे त्वरित पूर्ण करून नागरिकांना त्रास होणार नाही याची दखल घेण्यात यावी. त्याचप्रमाणे प्रस्तावित रस्त्यांची कामे त्वरित मार्गी लावावीत असे निर्देश त्यांनी प्रशासनाला दिलेत. स्थावर मालमत्ता, नगररचना या विभागांतर्गत सुरू असलेल्या व प्रस्तावित विविध प्रकल्पांचा आढावा घेण्यासाठी या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

सद्यस्थितीत नागपूर शहरात मुख्यत्वेकरून सुरू असलेले सीमेंट काँक्रीट रस्त्यांचे काम दोन टप्प्यात सुरू असून पहिल्या टप्प्यतील 100 फूट रस्त्यांचे काम अंतिम टप्प्यात आहे. त्याचा प्रतिमहिना खर्च 2.5 कोटी आहे. हा संपूर्ण भार महानगरपालिका वहन करणार आहे, अशी माहिती मुख्य अभियंता उल्हास देबडवार यांनी दिली. दुसऱ्या टप्प्यातील रस्त्यांचे काम हे 300 कोटींचे असून त्यातील 100 कोटी महाराष्ट्र शासन, 100 कोटी नासुप्र, 100 कोटींचा भार मनपा वहन करणार आहे. या टप्प्यात 55 किमी रस्त्यांचे बांधकाम करण्याचा निर्धार असल्याची माहिती देबडवार यांनी यावेळी दिली. दुसऱ्या टप्प्यातील काम 25 टक्के पूर्ण झाले असून उर्वरित कामे लवकरच पूर्ण करू, असे आश्वासन त्यांनी दिले. ज्या ठिकाणी पाईपलाईन ही एक फूट खोलवर आहे त्याठिकाणी सिमेंट काँक्रीटचे काम न करता डांबरीकरण करणार असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. प्रस्तावित कवीवर्य सुरेश भट सभागृहाचे काम जूनपर्यंत पूर्ण होईल अशी माहितीही त्यांनी यावेळी दिली.

एलएडी महाविद्यालय ते अंबाझरी येथील रस्त्याचे काम मागील एका वर्षापासून सुरू असून त्याबाबत नागरिकांच्या तक्रारी येत आहे. त्या रस्त्याचे काम पूर्ण करून सात दिवसाच्या आत तो विषय मार्गी लावावा, अशा सूचना सभापती संजय बंगाले यांनी संबधित अधिकाऱ्यांना दिल्यात. त्याचप्रमाणे ज्यांच्याकडे अनधिकृत भूखंड असतील त्यांना ताबडतोब नोटीस देऊन ते भूखंड जप्त करा, असे आदेश सभापती बंगाले यांनी यावेळी अधिकाऱ्यांना दिलेत.

बैठकीला कार्यकारी अभियंता चौगंजकर, कुकरेजा, स्थावर अधिकारी भुते, अधीक्षक अभियंता मनोज तालेवार, कार्यकारी अभियंता (स्लम) डी.डी. जांभूळकर, उद्यान अधीक्षक सुधीर माटे, नगररचना विभागाच्या सहायक संचालक सुप्रिया थूल, अधीक्षक अभियंता दिलीप जामगडे आदी उपस्थित होते.

---